पुढारी

# धडाडीचे नेतृत्व : पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ



**के. के. वाघ शिक्षण संस्था अर्थात कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था, नाशिक ज्यांच्या नावाने दिमाखात सुरू आहे असे कर्मवीर काकासाहेब वाघ हे नाशिक जिल्ह्याचे वैभव होते. काकासाहेबांनी आयुष्यभर स्वतःला समाजसेवेत वाहून घेतले होते. समाजासाठी आयुष्यभर झटणाऱ्या कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज, बडोदा संस्थानाचे सयाजीराव गायकवाड महाराज व महात्मा फुलेंच्या विचारांचे ते पाईक असल्याने त्यांनी शेतकरी आणि बहुजन समाजासाठी आयुष्यभर आपले सक्रिय योगदान दिले. २२ जुलै त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.**

कर्मवीर काकासाहेब वाघ माझे आजोबा होते. हे मी माझे भाग्य समजतो. समाज सेवेत वाहून घेतलेल्या या कर्मवीरांना माझी आजी गीताई वाघ यांची खंबीर साथ लाभली. त्यांनी अखिल भारतीय मराठा विद्या प्रसारक परिषदेचे प्रमुख आधारस्तंभ, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे आधारवड, निफाड सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व रानवड कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष, इंडियन शुगर इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन, नवी दिल्लीचे अध्यक्ष अशा अनेक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पेलल्या. काकासाहेब यांनी स्वतःच्या घरापेक्षा, स्वतःच्या हितापेक्षा कार्यकर्ते, कारखान्याचे सेवक आणि गरजू लोकांना अधिक जपले. त्यामुळेच, ही सर्वसामान्य माणसे काकासाहेबांना दैवत माणतात.

१९२० च्या काळात राज्यभरात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने बदल घडत होते. त्या काळातील ब्रिटिशांचे शिक्षणविषयक धोरण प्रतिगामी व संकुचित होते. बहुजन समाजच फक्त शिक्षणापासून वंचित होता. राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले व सयाजीराव गायकवाड यांनी यासंदर्भात पुढाकार घेतला. या महापुरुषांच्या कार्याची प्रेरणा घेत काकासाहेबांनी शिक्षणांचे कार्य हाती घेतले.

१९५७ साली द्वैभाषिक मुंबई राज्यातील विधानसभा निवडणुकीत ते कम्युनिस्ट पक्षाकडून निफाड मतदार संघातून 'आमदार' म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी विधानसभेत शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न मोठ्या तळमळीने व अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले व मार्गी लावले. यादरम्यानच्या काळात त्यांनी निफाड तालुक्यात सर्वाधिक 'इलेक्ट्रिफिकेशन्स'ची कामे करून घेतली. त्याचा सकारात्मक परिणाम असा झाला की, सन १९७० पर्यंत निफाड तालुका राज्यातील सर्वाधिक वीजपंप वापरणारा तालुका म्हणून अग्रस्थानी होता.

सन १९६५ रोजी देशाचे संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण दिल्लीत गेल्यावर त्यांना खासदार होणे आवश्यक होते. यावेळी त्यांना नाशिक येथून 'खासदार' म्हणून बिनविरोध निवडून दिले. या कृतज्ञतेपोटी व काकासाहेब वाघ यांच्या प्रयत्नांमुळे ओझर येथे संरक्षण मंत्रालयाशी संबंधित मिग विमान कारखाना अर्थात एच.ए.एल. सुरू केले.

निफाड येथे पिंपळगाव बसवंत या मध्यवर्ती ठिकाणी विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून वरिष्ठ महाविद्यालय सुरू करावयाचे ठरले पण परवानगी, पैसा, जागा आणि वर्गखोल्या यासंदर्भात अनेक अडचणी होत्या. आर्थिक अडचण दूर करण्यासाठी काकासाहेब सहकाऱ्यांसह निफाड, चांदवड, दिंडोरी व परिसरात पायी फिरले आणि त्यांनी अडीच लाख रुपये उभारले. काकासाहेब वाघ यांनी दाखविलेली ही धडपड आणि केलेले प्रयत्न पाहून सर्वानुमते या महाविद्यालयाचे 'कर्मवीर काकासाहेब वाघ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय' असे नामकरण केले. हे महाविद्यालय आजही दिमाखात सुरू आहे.

जिल्ह्याला प्रगतिपथावर घेऊन जायचे असले, तर सहकारातून कारखानदारीशिवाय पर्याय नाही हे जाणून त्यांनी प्रयत्न केले. त्यामागे आपला जिल्हा साखर कारखानदारीत मागे राहू नये, अशी त्यांची प्रांजळ इच्छा होती. तसेच दूरदृष्टी ठेवून सहकारी तत्त्वावर त्यांनी निफाड, गिरणा, रानवड, नाशिक व कादवा कारखान्यांकरिता मंजुरी मिळवून दिली.

काकासाहेब वाघ यांचे हे त्यागमय जीवन, त्यांनी सहकार, कृषी शिक्षण, सामाजिक व राजकीय या क्षेत्रांत सामाजिक बांधिलकी यामुळे जनतेने त्यांना 'कर्मवीर' ही पदवी बहाल केली. त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांच्या २६ जानेवारी १९७० रोजी त्यांना 'पद्मश्री' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन यथोचित गौरव केला. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन. !

**- समीर बाळासाहेब वाघ,**

अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

Nashik Edition

Jul 22, 2025 Page No. 04

Powered by: erelego.com